**चित्रनिरीक्षणासाठी मुद्दे**

१.चित्रकाराचे नाव.

२.चित्राचा प्रकार काय आहे तो पहा.उदा. निसर्गचित्र , व्यक्तीचित्र, प्रसंगचित्र, स्थिरचित्र, पौराणिक चित्र ह्यापैकी आहे का ते शोधा.

३. चित्राचा विषय काय आहे तो शोधा उदा. निसर्ग चित्र असा प्रकार असेल तर पावसाळ्यातील एक गाव किंवा पावसातील मुले असा विषय असू शकतो. दिलेल्या चित्रातला विषय शोधा.

४. रंग, आकार, रेषांचे संयोजन चित्रकाराने कसे केले आहे त्यासाठी चित्राकडे बारकाईने पहा. चित्र कधी जवळ आणून तर कधी थोडे लांब ठेवून पहा. कोणता रंग अधिक वापरला आहे? किती गडद किंवा फिका आहे? एकूण चित्रामध्ये सरळ रेषा , वाकड्या रेषा, आकार कसे वापरले आहेत ते पहा. त्यातून चित्राल उठाव कसा येतो ते पहा. चित्रातल्या भावभावना कशामुळे खऱ्या वाटतात ते ओळखा.

५.चित्रासाठी वापरलेले साहित्य उदा.  तैलरंग, जलरंग,खडू, कोळसा (tabवर हे समजू शकते का?)

६.चित्रात अशी गोष्ट असते जी नजरेत भरते किंवा ज्याकडे वारंवार लक्ष जाते. तुम्हाला अशी गोष्ट सापडतेका ते पहा.

७.चित्रात अजूनही घटक असतात ज्या कडे आपण लक्ष द्यायला हवे. उदा. चालणे, हातात हात,मांडी घातलेली, एकमेकांकडे पाहणे इ. ह्यामुळे चित्रात काहीतरी घडत आहे किंवा चित्र बोलत आहे असे वाटते.

८. छाया आणि प्रकाश ह्यामुळे चित्रात वेळ, स्थळ, सावली, प्रकाश,घराच्या आत आणि बाहेरची जागा दाखवायला मदत होते. तुमच्या चित्रात असे काही आहे का ते पहा.